**<u>नियमित दिवाणी दावा क्र.४२/२०११ मधील निशाणी क्रमांक १७३ वरील आदेश</u>**

बाबासो भोसले वि. शिवाजी व इतर

**CNRNO.MHSN070001662011**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ११, नियम १४ प्रमाणे दाखल केला आहे.

०२. वादी यांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे की, प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने तुटक वाटप होवून मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत ब मधील मिळकत क्र. १०/१–जमीन गट क्र. ५१७, मिळकत क्र. १०/२–जमीन गट क्र. ५१६ व मिळकत क्र.१०/३–जमीन गट क्र. ३६९/२ (पूर्वीचा ग.क्र.३६९) या मिळकती यातील मूळ प्रतिवादी क्र. १ शिवाजी निवृत्ती भोसले यांनी एकत्र कुटुंबासाठी खरेदी केल्या. त्यावेळी त्यांनी अनुक्रमे त्यांचा मुलगा सुरेश शिवाजी भोसले (गट क्र. ५१६ व ५१७) तसेच चंद्रकांत शिवाजी भोसले (गटक्रमांक ३६९) यांच्या नांवे खरेदी केलेल्या आहेत. त्या खरेदीपत्राच्या अस्सल प्रती यातील प्रतिवादी क्र. १ शिवाजी यांचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. १/१ ते १/३ यांचे ताब्यात व कब्जात आहेत. त्या जमीन गट क्र. ५१६,५१७ व ३६९ च्या खरेदीपत्राच्या सर्टिफाईड प्रति याकामी वादींनी फेरिस्त नि.क्र. ११४ कडे अनुक्रमे १,२ व ३ कडे हजर केलेल्या आहेत.परंतु न्यायाच्या दृष्टीने सदरच्या खरेदीपत्राच्या मूळ प्रति याकामी अभीलेखावर येणे आवश्यक आहेत. सदर प्रती अभीलेखावर आल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही.

०३. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादींनी सदर मिळकतीबाबत वाटप मागितलेले आहे. त्यामुळे जमीन गट क्र. ५१६, ५१७ व ३६९ चे अनुक्रमे खरेदी तारीख २९.१०.१९८७, २५.०१.१९९६ व २१.०१.१९९६ रोजीची मळणगांव येथील खरेदीपत्रे, जी प्रतिवादी क्र. १/१ ते १/३ यांच्या ताब्यात आहेत, त्या खरेदीपत्राच्या मूळ प्रती अभीलेखावर दाखल करण्यासाठी प्रतिवादी क्र. १/१ ते १/३ यांना आदेश करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

०४.		सदर अर्जास प्रतिवादी क्र. १/१, ३ व ४ यांनी अर्जाखाली आपले म्हणणे सादर करुन वादी यांनी मागणी केलेली मूळ कागदपत्रे जुनी असल्याने त्याच्या प्रति या प्रतिवादींकडे उपलब्ध नाहीत असे कथन केले आहे. सदर अर्जास प्रतिवादी क्र. २/१ ते २/४ यानी आपले म्हणणे सादर करुन अर्जातील मजकूर खोटा आहे. तो कायदयानुसार चालण्यास पात्र नाही. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

०५.		दोनही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०६.		प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने तुटक वाटप होवून मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, वादमिळकतीपैकी गटक्रमांक ३६९/२, ५१६, ५१७ या मिळकतीबाबत झालेली खरेदीखते ही प्रस्तुत दाव्यातील आवश्यक कागदपत्रे आहेत. भारतीय पुरावा अधिनियम मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार कागदोपत्री पुरावा देताना त्या कागदपत्रांची मूळ प्रत अभीलेखावर देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर खरेदीखतांच्या मूळ प्रति अभीलेखावर आल्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये न्यायनिर्णयास मदत होणार आहे. प्रतिवादी यांनी देखील आपल्या नि.क्र.६२ वरील कैफियतीमध्ये ग.क्र. ५१७,५१६ व ३६९ या शेतजमिनी त्यांनी नोंदणीकृत दस्ताआधारे खरेदी केल्या असल्याचे कथन केले आहे. म्हणजे सदर खरेदीखते ही प्रतिवादी यांच्या हक्कात झालेली असल्याने ती खरेदीखते प्रतिवादी यांच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत व कागदपत्रे जुनी असल्याने मिळून येत नसल्याचे कथन केले असले तरी सदर खरेदीखतांचे दस्त हरविले असल्याबाबत प्रतिवादी यांनी नमूद केले नाही. त्यामुळे प्रतिवादी हे जाणीवपूर्वक संबंधीत खरेदीखतांच्या मूळ प्रति अभीलेखावर दाखल करण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत आहे. यास्तव प्रतिवादी यांनी ग.क्र.५१७,५१६ व ३६९ चे अनुक्रमे खरेदी तारीख २९.१०.१९८७, २५.०१.१९९६ व २१.०१.१९९६ रोजीची मळणगांव येथील खरेदीखते अभीलेखावर

दाखल करणेबाबत निर्देशित करणे न्यायोचित ठरते. सबब खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१/१ ते १/३ यांना असे आदेशीत करण्यात येते की, ग.क्र. ५१७,५१६ व ३६९ चे अनुक्रमे खरेदी तारीख २९.१०.१९८७, २५.०१.१९९६ व २१.०१.१९९६ ची मळणगांव येथील खरेदीखतांच्या मूळ प्रति अभीलेखावर पंधरा दिवसाच्या आत दाखल कराव्यात.

KADAM NUTAN SACHIN

Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2025.07.09 07:34:22 +0530

(श्रीमती एन.एस.कदम)

दिनांक ८.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P. D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -03.07.2025
Order signed by the
Presiding Officer on -03.07.2025
Order uploaded on 04.07.2025